MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –०८ | बुधवार दि.२५ सप्टेंबर २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -08 | WEDNESDAY DT.25 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## गेवराई तालुक्यातील दोन कामगारांवर काळाने घाला घातला हिरापूर जवळ अंगावर वीज पडल्याने दोन जणांचा जागीच मृत्यू

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : बीड येथून कामावरून गावाकडे परत चाललेल्या कामगारांच्या अंगावर विज कोसळल्याने जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना काल मंगळवारी गेवराई तालुक्यात घडली आहे. बाबुराव सुर्यभान पिंपळे(वय २७) व लहू उद्धव खरात (वय ३२) दोन्ही रा.अर्धमसला ता गेवराई जि.बीड अशी मृतांची नावे आहेत. ही दोन्ही युवक नामलगाव येथील चारचाकीच्या शोरूम मध्ये काम करत होती. मंगळवारी दि. २४ बाबुराव पिंपळे व लहू खरात सायंकाळी उशिरा कामावरून गावाकडे दुचाकीवरुन परत येत असतानाच पाऊस अन् विजेचा होणारा कडकडाट सुरु असल्याने ते सोलापूर–छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावरील हिरापुर जवळपास थांबत निवारा शोधण्यात जात असतानाच या दोघांच्या अंगावर विज कोसळली यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या त्यांच्या आकस्मित मृत्यूने अर्धमसला गावात शोककळा पसरली आहे. या दोन्ही युवकांचे मृतदेह उत्तरीय तपासणीस बीडच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत.आज दुपापर्यंत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# मनोज जरांगे यांचे उपोषण ९ व्या दिवशी स्थगित मराठ्यांना त्रास देणाऱ्यांना सरळ करण्याचा इशारा

**जालना – मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाच्या ९ व्या दिवशी उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा केली आहे. मराठा समाजाच्या वतीने मला उपोषण न करण्याचा आग्रह करण्यात आला होता. माझ्या माय माऊल्यांनी त्यासाठी मला वारंवार विनंती केली. त्यामुळे आपण उपोषण स्थगित करत असल्याचे मनोज जणांनी पाटील यांनी सांगितले आहे. इतकेच नाही तर ज्यांनी – ज्यांनी मराठा समाजाला त्रास दिला, त्यांना सोडणार नाही, असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.**

**राज्यातील ओबीसी आणि मराठा समाज एकच असल्याचा दावा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. या निमित्ताने मराठा समाज एकत्र आला, हे एक चांगले झाले असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. आपल्या आंदोलनामुळे मुलींना मोफत शिक्षण मिळाले असल्याचा दावा त्यांनी केला. नेत्यांना आणि त्यांच्या मुलालाच मोठा करू नका. तुमच्या लेकींचे**



**वाटोळ करू नका, मुलींला धोका देऊ नका, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. एकाही नेत्याच्या सभेला जायचे नाही, असे आवाहन देखील त्यांनी केले. घरी बसून रहा पण नेत्यांच्या सभेला आणि प्रचाराला जाऊ नका, असे आव्हान देखील त्यांनी केले आहे.**

मराठा समाजाने कोणत्याही नेत्याच्या सभेला जाऊ नये

मराठा नेत्यांनी एकमेकांना साथ द्या, मराठा समाजाने कोणत्याही नेत्याच्या सभेला जाऊ नका, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. मराठा समाजातील माता बहिणी मोठ्या प्रमाणात आंतरवाली सराटी येथे येत आहेत. त्यामुळे राज्यातील मराठा समाजाचे हाल होण्याची स्थिती निर्माण झाली आहे. याचबरोबर गावाच्या देखील काही समस्या आहेत. माता भगिनींनी मला उपोषण सोडण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे आता आपण उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा जरांगे पाटील यांनी केली आहे. ज्यांनी ज्यांनी मराठा समाजाला त्रास दिला आहे, त्यांनाही इशारा देत त्यांनी सुरुवात केली आहे, त्याचा शेवट मराठाच करणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.


## मराठा आरक्षणाला धनगर समाजाचा जाहीर पाठिंबा...

वडीगोद्रीच्या आंदोलनाचा आणि धनगर समाजाचा काही संबंध नाही, आनंद काळे

वडवणी ।प्रतिनिधी

अंतरवाली सराटी या ठिकाणी चालू असलेले उपोषण आणि त्यामध्ये चालू असलेले वाद यामध्ये आमचा धनगर समाज कदापी पडणार नाही. मूळतः आमची धनगर समाजाची जी मागणी आहे ती (एसटी अनुसूचित जमाती) मध्ये असलेल्या आरक्षणाची अंमलबजावणीची मागणी आहे. त्यामुळे मराठा समाज नेहमी धनगर समाजाच्या आरक्षणाच्या बाजूने आहे त्याच प्रकारे धनगर समाज सुद्धा मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध करत नाही...!

वडीगोद्री या ठिकाणी ओबीसी समाजाचा आंदोलन चालू आहे, त्या ठिकाणी धनगर समाजाचा काही संबंध नाही, धनगर समाजाचा मेन आंदोलन पंढरपूर या ठिकाणी चालू आहे, त्यामुळे धनगर समाज पंढरपूर येथील एसटी आरक्षणासाठी



पाठिंबा देत आहे, असं प्रसिद्धी पत्रकाद्वारे माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे धनगर समाजाचे नेते आनंद भैय्या काळे यांनी म्हटले आहे,

## गहिनीनाथ गडासाठी तीर्थक्षेत्र विकास निधी दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे जाहीर आभार–सुरेश पाटील

पाटोदा ।प्रतिनिधी

राज्यातील विविध तीर्थक्षेत्र विकासाच्या सुमारे ३०५ कोटी ६३ लाख रुपयांच्या आराखड्यांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. यापैकी पाटोदा तालुक्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र गहीनाथ गडाला २ कोटी ६७ लाख रुपये निधीला मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांचे शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा समाजसेवक सुरेश पाटील यांनी जाहीर आभार मानले आहेत.

तसेच या तीर्थक्षेत्र विकासाच्या निधीमध्ये क्षेत्र पंढरपूर येथील दर्शन मंडप व दर्शन रांग या सुविधेसाठी १२९ कोटी ४९ लाख रुपयांच्या कामांचाही समावेश आहे. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या सरकारमधील मंत्री तसेच उच्चपदस्थ शासकीय अधिकारी या बैठकीला उपस्थित उपस्थित होते. अर्थसंकल्पात तसेच वेळावेळी आश्वासित केल्याप्रमाणे आपण राज्यातील तीर्थस्थळांच्या विकासासाठी आपण भरीव निधी उपलब्ध करून देत आहोत. त्याप्रमाणे या तीर्थस्थळ व पर्यटनस्थळांच्या विकासासाठी तातडीने नियोजन करण्यात यावे. यासर्वच ठिकाणची कामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण व्हावीत याची काळजी घ्यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री शिंदे यांनी या बैठकीत दिले. पंढरपूर विठ्ठल–रुक्मिणी मंदिर परिसरात भाविक आणि पर्यटकांसाठी दर्शन मंडप व दर्शन रांग सुविधा उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १२९ कोटी ४९ लाख रुपयांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. भगूर (जि. नाशिक) येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित थीमपार्क साकारण्यात येणार आहे. त्यासाठीच्या चाळीस कोटी रुपयांच्या प्रस्तावास तसेच पहिल्या टप्प्यातील १५ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. आष्टी मतदारसंघातील प्रसिद्ध श्री क्षेत्र गहिनीनाथगड चिंचोली तालुका पाटोदा च्या विकास आराखड्यातील २ कोटी ६७ लाखांच्या कामांस मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय नामदार एकनाथजी शिंदे यांचे जाहीर आभार मानले असून आलेल्या निधीचा योग्य वापर होईल यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत असेही समाज माध्यमात सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील यांनी बोलतांना केले.

आष्टी मतदारसंघातील श्री क्षेत्र



गहिनीनाथगड येथील मुख्यकमान वेशीच्या बांधकामाची पाहणी व दर्जेदार कामाच्याीश्र सूचना करतांना शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा समाजसेवक सुरेश पाटील दिसत आहेत.

## धारूर तालुक्यातील विविध प्रश्नांसाठी शिवसेना उबाठा गटाचे तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण

### मुख्यालयाच्या ठिकाणी उपस्थित न राहणाऱ्या ग्रामसेवक तलाठी यांच्यावर कार्यवाही करा– तालुकाप्रमुख बाबासाहेब सराफ

किल्ले धारूर/ रोहित फावडे

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने धारूर तालुक्यातील विविध प्रश्नांसाठी धारूर तहसील प्रशासनाला दि.५ रोजी निवेदन देण्यात आले होते,दिलेल्या निवेदनाची तहसील प्रशासनाने कसल्याही प्रकारे दखल घेतली नसल्याने शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दि.३० रोजी पासून आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे तहसिलदार यांना दिला आहे.यामध्ये प्रमुख मागण्या:– ई पिक पाहाणी ची आट रद्द करून सरसगट शेतकऱ्यांना पंचनामे न करता पन्नास हजार रुपये अनुदान वाटप करण्यात यावे,मनरेगा योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या विहिरीच्या व फळबागाच्या कुशल बिलाची रक्कम तत्काळ वाटप करण्यात यावी, प्रधानमंत्री घरकूल योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या घरकुल लाभाव्यर्थ्यांच्या घरकुल अनुदानाची रक्कम लाभार्थ्याच्या खात्यावर तत्काळ वर्ग करण्यात यावी,अरणवाडी घागरबाडा रस्ता कामाचे गुणवता गुण नियंत्रक मंडळाकडून तपासणी करून भ्रष्टाचार करणाऱ्या गुत्तेदार अभियंता यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी , व सदरील काम तत्काळ पूर्ण करण्यात यावे, मनरेगा .योजनेअंतर्गत मौजे भायजळी येथील सर्वे नंबर ५०६/२ मध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय धारूर मार्फत रोपवाटिका चालू करून मजूरांना रोजगार देण्यात यावे,महाराष्ट्र ग्रामीण बँक तेलगाव अंतर्गत दत्तक असलेल्या गावातील मागेल त्या शेतकऱ्याऱ्यांना तात्काळ पीक कर्ज वाटप करण्यात यावे,मुख्यालयाच्या ठिकाणी न राहणाऱ्या ग्रामसेवक तलाठी यांच्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी,या मागण्यासाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उपोषण करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे तहसीलदार यांना दिला आहे.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख बाबासाहेब सराफ, विनायक ढगे, बंडू बप्पा



सावंत शिवसेना ता.संघटक,चंद्रशेन तिडके,बाबा तिबोले, दयानंद आदमाने युवासेना तालुकाप्रमुख रोहित फावडे शिवराज भोसले, कृष्णा इंगळे,रघुनाथ तोंडे यांच्या सह शिवसेनेचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## धारूर व केज तालुक्यांतील ३० गावात बालक व युवक घटांना खेळाचे साहित्य

किल्लेधारूर । प्रतिनिधि

मराठवाडा ग्रामीण विकास संस्था गेल्या एक वर्षापासून बीड जिल्ह्यातील ३० गावांमध्ये ऊसतोड कामगार महिला मुलांच्या प्रश्नावर काम करत आहे. प्रत्येक गावात ऊसतोड कामगार महिला समिती पुरुष समिती बालक गट व युवक गट स्थापन करून मुलांच्या व महिलांच्या आरोग्याबाबत संस्थेचे काम चालू आहे. उसतोड कामगार महिला व मुलांच्या हक्काचे संरक्षण प्रकल्पाच्या माध्यमातून ३० गावातील बालक व युवक गटातील मुलांना खेळ साहित्य वाटप करण्यात आले.



यावेळी कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती एम जी व्हि एस व युवा ग्राम चे संपर्क अधिकारी एच.पी.देशमुख, जाल्हा प्रकल्प समन्वयक भाग्यश्री वाघमारे , युवा ग्रामचे संतोष रेपे, गावं स्वयंसेवक निवेदिता गवळी, राहुल घनघाव, देवानंद चव्हाण, दीपक डोंगरे, फुलचंद खाडे व गावातील ऊसतोड कामगार महिला व पुरुष समिती सदस्य उपस्थित होते.

मुलांना खेळाची सवय लागावी व त्यांचा शारीरिक विकास व्हावा याचबरोबर मुलांनी आई–वडिलांसोबत ऊस तोडीला न जाता शाळेत टिकून राहावे मुलांना शाळेची गोडी लागावी याकरिता मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेने खेळाचे साहित्य देऊन मुलांना शाळेत टिकून राहण्यासाठी केलेला हा छोटासा प्रयत्न आहे. हे खेळाचे साहित्य बीड जिल्ह्यात केज तालुक्यातील १५ व धारूर तालुक्यातील १५ गावांचा समावेश आहे.प्रकल्प संपर्क अधिकारी एच पी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हे खेळाचे साहित्य बालक व युवकांना वितरण चालू आहे याकरिता मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे कर्मचारी मुलाचे परिश्रम घेत आहेत.

ऊस तोड कामगारानी स्थलांतर होण्या पुर्वी नोंदणी करा–संतोष रेपे

बीड जिल्ह्यातील सर्व ऊसतोड कामगार कुटुंबांनी कारखान्याकडे मार्गस्थ होणे अगोदर आपली ऊसतोड कामगार म्हणून नोंदणी करावी व ओळखपत्र घ्यावे असे आवाहण युवा ग्रामचे संतोष रेपे यानी कैले आहे

## उमापर फाटा येथे रिक्षातून आठ तलवारी घेऊन जात असताना एकाला अटक

### चकलांबा पोलिसांची कारवाई; आठरा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : चकलांबा पोलिस ठाणे हद्दीतील दूरक्षेत्र उमापुर पोलिस चौकीची हद्दीत उमापुर फाटा येथील एक ईसाम रिक्षात गेवराईकडे आठ तलवारी घेऊन जात असल्याची माहिती गूप्त बातमीदाराने चकलांबा पोलिसांना दिली तसेच चकलांबा पोलिसांनी सदरचा रिक्षा व एकजन याला ताब्यात घेतले आहे तसेच या कार्यवाईत १८ अंदाजे हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती चकलांबा पोलिस ठाण्याचे सपोनि नारायण एकशिंगे यांनी दिली आहे. सदरची कार्यवाई (दि २४ सप्टेंबर ) रोजी साडे सहाच्या दरम्यान केली आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,बीड पोलिस अधीक्षक यांच्या आदेशानुसार कायदा व सुवेस्थेला बाधा आणर्याऱ्या ईसमा विरूद्ध कडक कार्यवाईचे आदेश दिले असल्याने आज गोपनिय बातमीदाराने चकलांबा पोलिसांना एम एच १६ एसी ४१६ या रिक्षात एकजन आपल्या अर्थिक फायद्यासाठी आठ तलवारी गेवराईकडे घेऊन जात असल्याची माहिती दिली तसेच त्यावरून चकलांबा पोलिसांनी सदरचा रिक्षा व चालक व त्यातील एक प्रवासी



याला ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्याने त्यांचे नाव रतन देवराव पवार ( वय ४३ वर्ष ) असे सांगितले तसेच तलवारी बाबद परवाना असल्याचे विचारले असता त्याच्याकडे कुठलाही परवाना मिळून आला नाही तसेच एक रिक्षा वरील एकास पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणी गून्हा दाखल करण्याची प्रक्रीया चकलांबा पोलिसांत सुरू असून सदरची कार्यवाई चकलांबा ठाणे प्रमुख सपोनि नारायण एकशिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि अंनता तागडे, पोअ तूकाराम पवळ, पोशी विनोद सुरवसे यांनी केली आहे.

## हरणाच्या पाडसाचे कुत्र्याच्या तावडीतून प्राण वाचवले

### वनविभागाकडे सुपुर्त केले:– डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील शिवम कल्याण कोकाटे यांच्या शेतात सोयाबीन काढत असताना हरणाच्या पाडसावर रानातील कुत्र्यांनी हल्ला केला असता कल्याण कोकाटे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी याची फोनवरून डॉ.गणेश ढवळे आणि पत्रकार हरीओम क्षीरसागर यांना कल्पना दिली. आम्ही दोघांनी पावसाने झालेल्या चिखलामुळे मोटार सायकल जात नसल्याने एक किलोमीटर चिखलातून जाऊन पाडसाला ताब्यात घेऊन बीड वनपरिक्षेत्र अधिकारी काकडे यांना फोन वरून कल्पना दिली. त्यांनी वनपाल अंगद बहिरवाळ यांना फोन वरून पाडसाला ताब्यात घेण्यास सांगितले.वनपाल अंगद बहिरवाळ यांच्या सांगण्यावरून वनविभागातील कर्मचारी अनिल शेळके, मधुकर वायभट, हनुमंत वायभट हे लिंबागणेश येथे डॉ.गणेश ढवळेंच्या घरी सायं ८




वाजता पोहोचले.अगोदरच भेदरलेल्या पाडसाला डॉ.गणेश ढवळे यांनी घरी आणुन पाणी पाजले.त्यानंतर वनविभागाचे कर्मचा–यांना सुपुर्त करण्यात आले. यावेळी पत्रकार हरीओम क्षीरसागर,गणपत तागड, कल्याणबापु वाणी , बालासाहेब जाधव उपस्थित होते.

# कृषीमंत्री यांच्या बीड जिल्ह्यात पिक विमा पंचनामे करण्यासाठी शेतकऱ्यांना द्यावे लागतात पैसे

कडा ।प्रतिनिधी

**निसर्गाच्या लहरीपणा व प्रकोपामुळे आष्टी तालुक्यातील शेतकरी देशोधडीला लागला आहे अतिवृष्टी व सतत च्या पावसामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे नुकसान झाले असून ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा भरला त्यांनी ७२ तासात विमा कंपनीकडे तक्रार केल्या**


अश्याच शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करण्याचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी विमा कंपनी मार्फत नेमण्यात आलेले प्रतिनिधी गावोगावी जाऊन शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे पंचनामे करत आहेत.मात्र आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा आर्थिक गैरफायदा उचलत विमा कंपनीचे हे प्रतिनिधी शेतकऱ्यांकडून प्रती पिक प्रती गटनंबर/ सर्व्हे नंबर दोनशे रुपयांपर्यंतची रक्कम उकळत आहेत. काही शेतकऱ्यांनी चार ते पाच पिके लावली आहेत. तसेच काही शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांचे अनेक खाते आहेत. यातुन शेतकऱ्यांना हजारों रूपये मोजले तरच विमा कंपनीचे प्रतिनिधी पंचनामे करतात. गावातील सर्व पंचनामे हे एकाच ठिकाणी बसून करण्यात येत असून हा प्रकार आष्टी तालुक्यातील मौजे अंभोरा,वाघळुज,चिंचाळा,बेलगाव यागावांसह तालुक्यातील इतर गावातही हा प्रकार घडला आहे. मौजे अंभोरा येथे विमा प्रतिनिधी असेच एका ठिकाणी बसून शेतकऱ्यांकडून पैसे घेत असल्याचा व्हिडिओ चित्रीकरण काही शेतकऱ्यांनी केले आहे. याचा जाब विचारणाऱ्या शेतकऱ्यांना विमा कंपनीचे प्रतिनिधी आत्महत्या करण्याची धमकी देत आहेत. तसेच कंपनीचे प्रतिनिधी काही शेतकऱ्यांकडून ही रक्कम फोन पे/गुगलपे वर देखील स्विकारत आहे.हि परिस्थिती संपूर्ण तालुक्यातील गावांमध्ये सुरू आहे. तालुका कृषी अधिकारी, तालुका विमा कंपनी प्रतिनिधी यांना याविषयी विचारले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली व या प्रकाराला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला आहे.तरि मे.तहसिलदार यांना,विनंती की शेतकरी वर्गाला देशोधडीला लावत त्यांच्याकडुन आर्थिक गैरफायदा उचलण्याच्या या प्रकाराची गंभीर दखल घेऊन संबंधित विमा कंपनी चे प्रतिनिधी, अधिकारी,कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी यासह सर्वच संबंधितांची चौकशी करून त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करावेत. कृषी मंत्र्यांच्या जिल्ह्यात होत असलेला हा प्रकार अतिशय निंदनीय आहे.याबाबत तातडीने कारवाई न झाल्यास तहसील कार्यालय समोर सोमवारी दि.३० रोजी शेतकऱ्यासह आंदोलन करणार आहे.यांची आपण गांभीर्याने नोंद घ्यावी असे तक्रार अर्ज पुराव्यांसह शेतकरी संघटनेचे आष्टी तालुका अध्यक्ष संतोष ऊर्फ पप्पू गुंड यांनी तहसीलदार आष्टी यांना दिले आहे.

# दासोपंत जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मराठी साहित्याचे नवकोट नारायण पासोडीकार सर्वज्ञ दासोपंत यांचा जन्मोत्सव सोहळा येथील दत्त संस्थान थोरले व धाकटे देवघर येथे उत्साहात भक्तीभावाने साजरा करण्यात आला जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त करूणाष्टक, स्तोत्र,मंत्र पुष्पाजंली आदींचे पठण ब्रम्हवृंदांच्या उपस्थितीत करण्यात आले दासोपंत सत्संग मंडळाचे कार्याध्यक्ष पत्रकार राहूल देशपांडे यांनी दासोपंतांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व त्यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली दासोपंत रचित भजनांचे गायन करण्यात आले यात दत्त भक्तांनी सहभाग घेतला इतरही विवीध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले

त्याचबरोबर समाधीस्थानावरही रुद्राभिषेक संपन्न झाला सर्व ठिकाणी भक्त गण, परिसरातील नागरीक, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते .



# मुख्यमंत्री युवा कार्यकारी प्रशिक्षण अंतरगत ट्रेनि शिक्षक निवड प्रक्रियेत बेकायदेशीर, नियमबाह्य भरती

बीड ।प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पहाडी दहिफळ ता. धारुर जि. बीड येथील मुख्यमंत्री युवा कार्यकारी प्रशिक्षण अंतरर्गत ट्रेनि शिक्षक निवड प्रक्रियेत बेकायदेशीर, नियमबाह्य अर्ज स्वीकारून भरती केल्याबद्दल ऋषिकेश भास्कर मस्के यांनी बीडचे जिल्हाधिकारी यांच्याकडे सदरील भरती प्रक्रियेतील अधिकारी यांची चौकशी करावी अशी मागणी केली आहे.

मौजे पहाडी दहिफळ येथील शाळेवर ट्रेनि शिक्षक नेमण्यासाठी अर्ज मागवण्यात आले होते. दिनांक २९/०८/ २०२४ पुवों अर्ज स्वीकारण्याची मुदत होती. सदर पदासाठी ऋषिकेश भास्कर मस्के, कदम दिनकर आत्माराव व मस्के नितीन गोवर्धन आसे तीन अर्ज प्राप्त झाले होते व दिनांक ३१/०८/ २०२४ रोजी निवड झालेल्याचे नाव घोषीत करण्यात येणार होते. परंतू माझ्यासोबत असणाऱ्या कदम दिनकर आत्माराव याचे वय नियमबाह्य आसल्याने सदर पदास पात्र नव्हता मस्के नितीन गोवर्धन याची ग्रामपंचायत या ठिकाणी निवड झाल्याने तोही सदर पदासाठी पात्र राहत नव्हता, परंतू गट शिक्षण अधिकारी कार्यालय पंचायत समिती धारुर येथील अधिकारी शिवाजी अंडील (गटशिक्षण विस्तार अधिकारी) यांच्या साडुची सुन आमच्या गावात रहिवाशी आसुन तीचा अर्ज मुदत बाह्य स्वीकारुन मुदतीत उशिराने प्राप्त झाल्याचे दर्शवण्यात आले सदर कार्यालयातील अधिकारी अंडील , मुख्याध्यापक नितीन जाधवर व मनोज कोल्हे यांनी त्यांच्या पदाचा दुरुउपयोग करुन नात्यातील व्यक्तीची निवड करण्याच्या हेतुने उशिराने अर्ज प्राप्त झाले असे दर्शवून सदर पदावर निवड करण्याच्या तयारीत आहेत तरी मी योग्य उमेदवार असतांना नियमानुसार वेळेत अर्ज सादर केलेले आसतांना सुध्दा जवळचे नातेवाईक कार्यालयात अधिकारी आसल्याने नियमबाह्य अर्ज दिल्यानंतरही त्याची निवड करत आहेत. तरी मा. साहेबांनी गांभीर्यपूर्वक लक्ष्य घालुन प्रकरणाची सखोल चौकशी करुन नियमबाह्य वर्तणुक करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन मला न्याय दयावा

# सुषमा अंधारे, अस्मिता गायकवाड यांच्या उपस्थितीत गेवराईत शिवसेनेचा २७ रोजी संवाद मेळावा

## बहुसंख्येने उपस्थित रहा -बदामराव पंडित

गेवराई ।प्रतिनिधी

संभाव्य विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष संघटन मजबूत करून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी आणि गेवराई विधानसभा मतदारसंघावर भगवा फडकवण्यासाठी दि २७ सप्टेंबर २०२४ रोजी शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे आणि शिवसेना उपनेत्या अस्मिताताई गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत स्त्री शक्ती संवाद दौरा आणि शिवसैनिकांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.



येत्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल. त्या पार्श्वभूमीवर गेवराई विधानसभा मतदारसंघावर शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता, र भ अट्टल महाविद्यालयाच्या बाजूला, शिवसेना भवन गेवराई जवळ स्त्री संवाद दौरा व शिवसैनिकांच्या भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे, शिवसेना उपनेत्या अस्मिताताई गायकवाड, शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव, महिला आघाडी संपर्कप्रमुख संपादाताई गडकरी, लोकसभा प्रमुख माजी आ सुनील धांडे, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर आदींसह शिवसेना पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्यास गेवराई विधानसभा मतदारसंघातील सर्व शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, माता-भगिनी, आजी-माजी जि प आणि पं स सदस्य, सरपंच, ग्रा पं सदस्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यासह गेवराई तालुकाप्रमुख अजय दाभाडे, बीड तालुकाप्रमुख गोरखराव सिंघम यांनी केले आहे.

# सरकारने मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या जिवाशी खेळणे थांबवावे - गौतम इनकर

नाळवंडी ।प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील असलेले अंतरवाली सराटीमध्ये मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सहाव्यांदा उपोषण सुरु केले आहे. सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी तसेच हैदराबाद सातारा आणि बॉम्बे गव्हर्मेंटचे गॅझेट लागू करावे यासह मराठा आंदोलकावरील आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत, या मागणीसाठी ते आठ दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत.आठ दिवसापासून मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील यांनी पाण्याचा घोटही न घेतल्यामुळे पाटील यांची प्रकृती अतिशय खालावली आहे.मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाच्या पाचव्या दिवशी त्यांची प्रकृती खालावली होती. यानंतर लोकांनी त्यांना उपचार घेण्याची विनंती केली होती. मंत्री शंभूराज देसाई यांनी देखील मनोज जरांगे यांना फोन करुन उपचार घेण्याची विनंती केली होती. त्यानंतर मनोज जरांगे यांनी उपचार घेतले होते. मनोज जरांगे यांना डॉक्टरांकडून सलाईन लावण्यात आले होते.

यानंतर आता आठव्या दिवशी मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती पुन्हा एकदा खालावली आहे. त्यामुळे आंदोलक महिलांकडून पाणी घेण्याची आणि उपचार घेण्याची विनंती करण्यात येत आहे. मनोज जरांगे यांनी उपचार घेण्यासाठी महिला आंदोलक रडताना दिसून आल्या. आता मनोज जरांगे पाटील उपचार घेणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.त्याच बरोबर मनोज जरांगे समर्थक गौतम इनकर यांनी सरकारला वेटीस धरल्याचे समोर येत आहे, मनोज जरांगे हे लाखो लोकांचे मार्गदर्शक आहेत,असा आंदोलन पुन्हा होणे नाही, सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या समाजासाठी मागत असलेल्या सर्व मागण्या तातडीने पूर्ण कराव्या आणि मनोज जरांगे यांना उपोषण मागे घेण्यासाठी विनंती करावी, मनोज जरांगे यांची तब्येत खालावलेली असून, मनोज जरांगे यांना होणाऱ्या यातना आणि वेदना सरकारच्या का लक्षात येत नाहीत, आठ दिवसापासून अन्नाचा एकही कण पोटात नाही पाण्याचा घोटही नाही तरीही सरकार जरांगे यांचे आंदोलन सोडायला तयार का नाही, सरकारच्या डोक्यात नेमका मनोज जरांगे यांच्या विषयी काय विचार आहे हा समजायला तयार नाही.मनोज जरांगे यांच्या वेदना समजून घ्या आणि समस्त मराठा बांधवांना न्याय द्या, या आंदोलनाकडे सरकारने तातडीने लक्ष नाही दिले मनोज जरांगे यांच्या जीवितास काही धोका झाला तर याला सर्वस्वी जबाबदार हे मुख्यमंत्री, दोन्हीही उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्रातील सरकार राहील, आणि जरांगे पाटील समर्थक हे सरकारला धारेवर धरल्याशिवाय राहणार नाहीत.असे आव्हान मनोज जरांगे पाटील समर्थक गौतम इनकर यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



# वैद्यनाथ कॉलेजची बोटॅनिकल एक्सर्षण शैक्षणिक सहल यशस्वीपणे संपन्न

परळी ।प्रतिनिधी

वैद्यनाथ कॉलेज परळी वैजनाथ येथील वनस्पतीशास्त्र विभागाने शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. त्या अनुषंगाने महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना चव्हाण मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सहली संदर्भात मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. विनोद गायकवाड, प्रा.डी.के. आंधळे प्रा. हरीश मुंडे वनस्पतीशास्त्राचे विभाग प्रमुख प्रो. डॉ. तुकाराम गित्ते, सहल प्रमुख प्रा. डॉ. सोमनाथ किरवले, प्रयोगशाळा सहाय्यक हरिदास कराड, परिचर संगमेश्वर नरवणे व विद्यार्थी विद्यार्थिनी यांचा सक्रिय सहभाग होता. वनस्पती शास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना जैवविविधतेबाबत अंबाजोगाई येथील घाट नागनाथ परिसरातील, अध्यकवी मुकुंदराज समाधी परिसर व वाना नदी काठच्या परिसरातील विविध वनस्पती संदर्भात त्याचे वैज्ञानिक व कॉमन नाव फॅमिली फुलांची




फळांची रचना आणि त्याचे उपयोग. याची सखोल अशी माहिती प्रो.डॉ. तुकाराम गीते व प्रा. डॉ. सोमनाथ किरवले यांनी दिली. विद्यार्थ्यांना वर्ग ज्ञानाबरोबरच जवळच्या परिसरातील निसर्ग रम्य वातावरणात विविध वनस्पती व वन्य प्राणी यांचे दर्शन घडले. विद्यार्थ्यासोबत वनभोजनाचा आनंद घेण्यासाठी प्राचार्य डॉ. अर्चना चव्हाण मॅडम व प्रो. डॉ. रमेश राठोड, स्टाफ सेक्रेटरी डॉ. बी.एस.सातपुते हे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना गोड पदार्थ खाण्यासाठी घेऊन आले. सर्वांनी मिळून भोजनाचा आस्वाद घेतला. त्यानंतर हत्तीखाना व जोगाई मंदिर पाहिले,हाशी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये परळी कडे मार्गस्थ होऊन बोटॅनिकल स्टडी टूर संपन्न झाली. प्राचार्य डॉ. अर्चना चव्हाण मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे व स्टाफ कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.



# देशात गेल्या काही दिवसांपासून डेंग्यूच्या रुग्णसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे चित्र आहे

**प्रतिनिधी । बीड**

देशात गेल्या काही दिवसांपासून डेंग्यूच्या रुग्णसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे चित्र आहे. केवळ भारतच नव्हे तर जगभरात डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याची नोंद आहे. या वर्षी जगभरात विक्रमी प्रकरणे नोंदवली गेली आहेत; ज्यात ब्राझील आणि इतर दक्षिण अमेरिकन देश सर्वात जास्त प्रभावित आहेत. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (डब्ल्यूएचओ) च्या डेटावरून असे दिसून येते की, डेंग्यूच्या



रुग्णांची संख्या वर्षानुवर्षे वाढत आहे. हा रोग कसा पसरतो? प्रकरणांमध्ये वाढ होण्याची कारणे काय? आणि या रोगाविरोधी लस उपलब्ध आहे का? त्याविषयी जाणूनयावर्षी किती लोकांना डेंग्यूचा संसर्ग?

डब्ल्यूएचओच्या जागतिक डेंग्यूच्या आकडेवारीनुसार, या वर्षी ऑगस्टपर्यंत जगभरात १२ दशलक्षाहून अधिक प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत आणि ६,९९१ जणांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. गेल्या वर्षभरात नोंदवलेल्या ५.२७ दशलक्ष प्रकरणांपेक्षा हा आकडा दुप्पट आहे. मागील वर्षापूर्वी गेल्या दशकभरात डेंग्यूची सुमारे दोन ते तीन लाख वार्षिक प्रकरणे नोंदवली गेली होती. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, २०२४ मध्ये नोंदवण्यात आलेला ही विक्रमी संख्यादेखील जास्त असण्याची शक्यता आहे. याचे कारण म्हणजे, भारतासह इतरही काही देश त्यांच्या डेटाचा अहवाल जागतिक पातळीवर देत नाहीत. डेटाचा अहवाल देणाऱ्या देशांमध्येही, डेंग्यूच्या प्रत्येक रुग्णाची चाचणी करून आरोग्य अधिकाऱ्यांना अहवाल दिला गेला नसावा अशी शक्यता आहे.

### डेंग्यू म्हणजे काय?

डेंग्यू हा एक विषाणूजन्य संसर्ग आहे. हा रोग रक्त शोषणार्या डासांद्वारे पसरतो. प्रामुख्याने डासांची एडिस इजिप्ती ही प्रजाती हा रोग पसरवण्यास कारणीभूत असते. संसर्गाने ग्रस्त बहुतेक लोकांमध्ये सौम्य लक्षणे दिसून येतात. ताप, तीव्र डोकेदुखी, स्नायू आणि सांधेदुखी, मळमळ आणि उलट्या, डोळ्यांमध्ये वेदना आणि शरीरावर पुरळ उठणे ही प्रमुख लक्षणे आहेत. गंभीर प्रकरणांमध्ये, संसर्गामुळे अंतर्गत रक्तस्त्राव होऊ शकतो आणि वेळेत उपाय न केल्यास मृत्यूदेखील होऊ शकतो. 'द लॅन्सेट'च्या संपादकीयात गेल्या दोन दशकांमध्ये नोंदवलेल्या प्रकरणांमध्ये दहापट वाढ झाली असल्याची माहिती आहे. डेंग्यू हा एकमात्र संसर्गजन्य रोग आहे, ज्यामुळे वार्षिक मृत्यू वाढत आहेत, असे त्यात नमूद करण्यात आले आहे.

### भारतातील परिस्थिती काय?

गेल्या दोन महिन्यांत अनेक शहरांमध्ये डेंग्यूच्या प्रकरणांमध्ये वाढ झाली आहे. नॅशनल वेक्टर बोर्न डिसीज कंट्रोल प्रोग्रामच्या ताज्या आकडेवारीनुसार, जून अखेरपर्यंत डेंग्यूमुळे ३२ हजारांहून अधिक प्रकरणे नोंदवली गेली आहेत आणि ३२ मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. गेल्या दोन महिन्यांत ही संख्या आणखी वाढली आहे. केंद्रीय आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा यांनी ऑगस्टच्या सुरुवातीला सांगितले होते की, २०२३ च्या याच कालावधीच्या तुलनेत भारतात या वर्षी डेंग्यूच्या रुग्णांमध्ये जवळपास ५० टक्के वाढ झाली आहे. मुख्य म्हणजे, भारतातही संसर्गाच्या भौगोलिक क्षेत्रात वाढ होत आहे. हा रोग २००१ मध्ये फक्त आठ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांपर्यंत सीमित होता, मात्र २०२२ पर्यंत हा रोग प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात पसरला आहे. लडाखमध्ये २०२२ मध्ये पहिल्या दोन प्रकरणांची नोंद करण्यात आली होती.

### डेंग्यूच्या वाढीमागील कारणं काय?

लॅन्सेट संपादकीयमध्ये शहरीकरण, हवामान बदल आणि लोकांच्या स्थलांतरालाही डेंग्यूच्या प्रसार वाढण्याची तीन प्रमुख कारणे असल्याचे सांगितले आहे.

शहरीकरण : दाट लोकसंख्या असलेल्या शहरी भागात हा रोग अधिक वेगाने पसरू शकतो. याचे कारण म्हणजे शहरातील मोकळ्या जागा एडिस इजिप्ती डासांना प्रजननासाठी पुरेशी जागा उपलब्ध करून देतात. हे डास साचलेल्या स्वच्छ पाण्यात प्रजनन करतात. सामान्यत: पावसाळ्यात. त्यानंतर या प्रकरणांमध्ये वाढ नोंदवली जाते. तुम्ही केवळ दिल्लीचे उदाहरण घेतल्यास सध्या दिल्लीत उष्णतेसह पाऊस पडतोय; ही डासांच्या वाढीसाठी सर्वोत्तम परिस्थिती आहे, असे नवी दिल्लीच्या इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनीअरिंग आणि व्हेक्टर बोर्न डिसीज ग्रुपमधील डॉ. सुजाता सुनील यांनी सांगितले.

# परतीचा पाऊस महाराष्ट्राला झोडपणार

## पुढील चार दिवसांसाठी 'या' जिल्ह्यांना अलर्ट

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील चार दिवस महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचं क्षेत्र निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा पाऊस सक्रीय झाला आहे.

परतीचा पाऊस महाराष्ट्राला झोडपणार, पुढील चार दिवसांसाठी 'या' जिल्ह्यांना अलर्ट

गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने महाराष्ट्रात पुन्हा एकदा हजेरी लावली आहे. मुंबईसह महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला आहे. सध्या सर्वत्र धो-धो पावसाला सुरुवात झाली आहे. राज्यात विविध ठिकाणी जोरदार पाऊस कोसळत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील चार दिवस महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचं क्षेत्र निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा पाऊस सक्रीय झाला आहे.

हवामान विभागाचा अंदाज काय?

हवामान खात्याकडून कोकण, मराठवाडा आणि विदर्भात मुसळधार पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. येत्या मंगळवारपासून पुढील चार दिवस महाराष्ट्रात ठिकठिकाणी वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचं क्षेत्र निर्माण झाल्यामुळे मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मान्सूनने पश्चिम राजस्थानपासून परतीचा प्रवास सुरू केला असून आता मान्सून गुजरातमधील कच्छ भागापर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे.राज्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. यामुळे काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट तर काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान विभागाने पालघर, ठाणे, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, नगर, पुणे, सांगली, सोलापूर, संभाजीनगर, जालना, लातूर, धाराशिव, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यात यलो अलर्ट जारी केला आहे. तर रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, परभणी, बीड, हिंगोली, नांदेडकरता पावसाचा ऑरेंज अलर्ट हवामान खात्याने दिला आहे.पुण्याच्या भोर तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसानं माझेरी गावात गुरांचा गोठा कोसळल्याची घटना घडली आहे. गोठा कोसळ्याने गोठ्यातील पाच जनावरे जखमी झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होतं.



### अहमदनगरमध्ये नदीला पूर, महामार्ग पाण्याखाली

तर अहमदनगर शहरासह जिल्ह्याला मुसळधार पावसाने झोडपले आहे. अहमदनगर शहराच्या बाजूने वाहत असलेल्या सीना नदीला पूर आला आहे. सीना नदीला आलेल्या पुरामुळे नगर - कल्याण महामार्गवरील पूल पाण्याखाली गेला आहे. नगर कल्याण महामार्ग वाहतुकीसाठी बंद पर्यायी मार्गाने वाहतूक वळवण्यात आली आहे. हवामान खात्याने पुढील तीन दिवस नगर जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. यामुळे रस्त्यांना नाल्यांचे स्वरूप आले आहे.

### वसई, विरार, पालघरला झोडपले

सध्या वसई-विरारमध्ये पावसाची संततधार सुरु आहे. रिमझिम पावसासह अधून मधून जोरदार पाऊस पडत आहे. वसई-विरार परिसरात आभाळ पूर्णतः भरून आले असून हवेत गारवा निर्माण झाला आहे. सध्या विरार ते चर्चगेट लोकल सेवा आणि शहरतील वाहतूक सुरळीत आहे. तर पालघरमध्ये मुसळधार पाऊस आणि वादळी वारा सुटला आहे. त्यामुळे पालघर तालुक्यातील सफाळे पूर्व भागात असलेल्या घाटीम परिसरामध्ये चार घरांचे पत्रे उडून मोठे नुकसान झाले आहे. तर काही घरांमध्ये पाणी साचले आहे. पालघरमध्ये परतीच्या पावसामध्ये मोठे नुकसान झाल्याने नुकसान भरपाई द्या, अशी मागणी शासनाकडे केली आहे.

# मलिकांना अजित पवार पुन्हा संधी देणार?

प्रतिनिधी । मुंबई

मुंबई :अणुशक्तीनगरच्या जागा ही महायुतीत कदाचित उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सुटण्याची शक्यता आहे. या जागेवर अजित पवार नवाब मलिक यांना पुन्हा संधी देतात का? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. विशेष म्हणजे आगामी विधानसभा निवडणुकीत नवाब मलिक यांच्यावक नवी लॉन्ड्रिंग प्रकरणाचे आरोप असल्यामुळे अजित पवार कदाचित त्यांच्या कन्येला विधानसभेचं तिकीट देऊ शकतात, अशी चर्चा आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीतही जोरदार हालचाली घडत असल्याची माहिती मिळत आहे. महाविकास आघाडी देखील नवाब मलिक यांच्याविरोधात तितकाच तगडा उमेदवार देण्याच्या तयारीत आहे. सूत्रांकडून याबाबत अतिशय महत्त्वाची माहिती समोर येत आहे. मविआत समाजवादी पक्षाकडून अणुशक्तीनगरच्या जागेची मागणी करण्यात येत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. समाजवादी पक्षाकडून फहद अहमद इच्छुक असल्याची सूत्रांची माहिती आहे. फहद अहमद हे अभिनेत्री स्वरा भास्कर यांचे पती आहेत. अहमद हे सध्या समाजवादी पक्षाच्या युवक प्रदेशाध्यक्षपदी कार्यरत आहेत. त्यांच्याकडून अणुशक्तीनगरच्या जागेची मागणी करण्यात आली आहे.



फहद अहमद यांनी २०२२ मध्ये समाजवादी पक्षात प्रवेश केला होता. त्याआधी त्यांनी विद्यार्थी संघटनांमध्ये काम करत अनेक रॅली आणि आंदोलनांमध्ये सहभाग घेतला होता. त्यांनी केलेल्या एका आंदोलनाला वंचित चे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनीदेखील समर्थन दिलं होतं. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शुल्क माफीबद्दलचं ते आंदोलन होतं. याशिवाय फहद अहमद यांनी सीएए कायद्याच्या विरोधातील रॅलींमध्ये सक्रीय सहभाग घेतला होता.

# जिजाऊ मॉ साहेब मल्टीस्टेटच्या घोटाळ्यातील प्रमुख आरोपी बबन शिंदेला अटक

प्रतिनिधी । बीड

जिजाऊ मॉ साहेब मल्टीस्टेटच्या घोटाळ्यातील प्रमुख आरोपी असलेला बबन शिंदे याला अखेर बीड पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.उत्तर प्रदेशमधील मथुरा वृंदावन परिसरातून बबन शिंदेला अटक करण्यात आली आहे. जिजाऊ मल्टीस्टेट प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यापासून बबन शिंदे फरार होता.बीडमधील जिजाऊ मॉ साहेब मल्टीस्टेट घोटाळा प्रकरणात बीड जिल्ह्यात ३ तर धाराशिव जिल्ह्यात २ गुन्हे दाखल आहेत.या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेला बबन शिंदे मागील वर्षीच्या जुलै महिन्यापासून फरार होता. त्याच्या शोधात ठिकठिकाणी पोलिस पथके कार्यरत होती मात्र सातत्याने आपली ठिकाणे बदलत, सीमकार्ड बदलत तो राहत होता. अखेर त्याच्या संदर्भाने गुप्त माहिती मिळाल्याने वृंदावन मथुरा परिसरात तो वेश बदलून राहत असल्याचे समोर आल्यानंतर आर्थीक गुन्हा शाखेच्या पथकाने सापळा रचला. पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनात आर्थीक गुन्हा शाखेच्या पथकाने मोठ्या शिताफिने साधुच्या वेशात राहत असलेल्या बबन शिंदेला बेड्या ठोकल्या आहेत.



# चकलांबा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

## अवैध वाळू वाहतूक करणारे चार हवा ताब्यात तीन आरोपी अटक, दीड कोटीचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । बीड

सविस्तर वृत्त असे की, काल दिनांक २३ ९ २४ रोजी ठाण्याचे प्रमुख सहा पोलीस निरीक्षक नारायण एक शिंगे यांना गोपनीय बातमीदारांमार्फत राक्षस भवन परिसरात रात्री अवैध वाळू वाहतूक होणार असल्याबाबत माहिती मिळाली होती. त्यानुसार त्यांनी सापळा रचला असता पथकाला चार अवैध वाळू वाहतूक करणारे हायवा वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या वेळी मिळून आले. त्यांना जागीच ताब्यात घेऊन चकलांबा पोलीस ठाणे येथे अनुक्रमे



गुन्हा रजिस्टर क्रमांक २८८/२०२४, २८९/२०२४,२८७/२०२४, २९०/२०२४ इछडकलम ४०३(२), ३(५) सह कलम १८४ मोटर वाहन कायदा प्रमाणे वेगवेगळे चार गुन्हे दाखल करून तीन आरोपी नामे १) अखिल अल्बक्ष पठाण राहणार महार टाकळी २) अंगत शामराव शिंगटे राहणार झापेवाडी ता शिरूर जि बीड ३) नजीर नसीर शेख रा शेकटा तालुका गेवराई जिल्हा बीड यांना अटक करून माननीय न्यायालयात भेटवले असता त्यांना दोन दिवसाची पोलीस कस्टडी देण्यात आली आहे. तसेच सदर गुन्ह्यात आणखी दोन आरोपी नामे १) अहमद मोहम्मद शेख रा उमापूर ता गेवराई जी बीड २) अमजद अहमद शेख रा उमापूर ता गेवराई जि बीड हेनिष्पन्न करण्यात आलेले आहेत सदरची कारवाई ही माननीय पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, पोलीस उपाधीक्षक नीरज राजगुरू साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एकशिंगे, पोलीस उपनिरीक्षक अनंता तांगडे, पोलीस हवालदार गुजर, खेत्रे, पवळ,घोंगडे,इंगोले मिसाळ इत्यादींनी केली.

# ऑक्टोबर महिन्यात बँका पंधरा दिवस बंद

प्रतिनिधी । मुंबई

ऑक्टोबर महिन्यात अनेक सण येत आहेत. गांधी जयंती पासून ते दसऱ्यापर्यंत अनेक मोठे सण या महिन्यात येतील. त्यामुळे बँकांना अनेक दिवस सुट्ट्याही असतील. आरबीआय च्या हॉलिडे कॅलेंडरनुसार ऑक्टोबर महिन्यात बँका जवळपास १५ दिवस बंद राहणार आहेत. त्यामुळे जर तुम्हाला बँकेशी संबंधित कोणतेही काम करायचे असेल तर ते वेळेत करुन घ्या. तुमचे काम वेळेवर पूर्ण करण्यासाठी तुम्हाला सुट्ट्यांचे दिवस माहित असायला हवेत. अन्यथा तुम्हाला अडचणीचा सामना करावा लागू शकतो.१ ऑक्टोबर (मंगळवार) जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुका असल्याने सुट्टी २ ऑक्टोबर (बुधवार): गांधी जयंती ३ ऑक्टोबर




(गुरुवार): शारदीय नवरात्रीची सुरुवात आणि महाराजा अग्रसेन जयंती. ६ ऑक्टोबर (रविवार): साप्ताहिक सुट्टी १० ऑक्टोबर (गुरुवार): महासप्तमी ११ ऑक्टोबर (शुक्रवार): महानवमी १२ ऑक्टोबर (शनिवार):

दसरा आणि दुसरा शनिवार १३ ऑक्टोबर (रविवार): साप्ताहिक सुट्टी १४ ऑक्टोबर (सोमवार): दुर्गा पूजा (दसैन), गंगटोक (सिक्कीम) १६ ऑक्टोबर (बुधवार) लक्ष्मी पूजा (अगरताळा, कोलकाता) १७ ऑक्टोबर (गुरुवार): वाल्मिकी जयंती २० ऑक्टोबर (रविवार): साप्ताहिक सुट्टी २६ ऑक्टोबर (शनिवार): प्रवेश दिवस (जम्मू आणि काश्मीर) आणि चौथा शनिवार २७ ऑक्टोबर (रविवार): साप्ताहिक जन्मदिन आणि दिवाळी. इ-छ्घ सुट्टी ३१ ऑक्टोबर (गुरुवार): नरक कज्डखऊ-ध चतुर्दशी, सरदार वल्लभभाई पटेल यांचा बँकांच्या सुट्ट्यांची यादी सर्व राज्यांमध्ये वेगवेगळी असते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (ठइख) नुसार, सर्व राज्यांच्या सुट्ट्यांची यादी सारखी नसते. या सुट्ट्यांची संपूर्ण यादी आरबीआय आपल्या अधिकृत वेबसाइटवर देत असते. वेगवेगळ्या राज्यात तेथील स्थानिक सणांच्या हिशोबाने या सुट्टी जाहीर केल्या जातात. पण बँका बंद असल्या तरी जे लोक ऑनलाईन सेवा वापरतात त्यांना कोणतीही अडचण येणार नाही.



सामाजिक कार्यात कायम अग्रेसर असणारे मा. सय्यद शाकेर अहेमद भैया यांची मानवाधिकार काँग्रेस पार्टीच्या मराठवाडा अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल भैया साहेबांना शुभेच्छा देताना आमिरखान सर यावेळी पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या .

# मुंडे यांच्या पुढे तगडे आव्हान

प्रतिनिधी । परळी

परळी मतदारसंघात मोठा उलटफेर करण्याचा प्रयत्न शरद पवार गट करत आहे. अजित पवार यांच्यासोबत गेलेले कृषीमंत्री धनंजय मुंडे यांना या मतदारसंघात मोठे आव्हान उभं करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. धनंजय मुंडे यांना गंगाखेडचे आ. रत्नाकर गुट्टे यांचा जावई आव्हान देऊ शकतो. या ताज्या घडामोडींमुळे या मतदारसंघात विधानसभेला मोठी धुमश्चक्री दिसल्याशिवाय राहणार नाही. काय घडत आहेत घडामोडी ?

गंगाखेडचे आमदार रत्नाकर गुट्टे यांचे जावई राजाभाऊ फड मुंबईत शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत. राजेभाऊ फड हे परळीतील आहेत. तसेच रासपाचे ते युवा प्रदेशाध्यक्ष राहिले असून परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी ते इच्छुक आहेत. फड यांचा परळी मतदारसंघात चांगला जनसंपर्क आहे. अशातच त्यांचा शरद पवार गटात प्रवेश होत असल्याने पक्षाने त्यांना उमेदवारी दिल्यास कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्यासमोर राजेभाऊ फड यांचे आव्हान असणार आहे. मात्र परळी विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, बबन गित्ते, सुदामती गुट्टे हे देखील निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे आता शरद पवार परळी विधानसभा मतदारसंघात नेमकी कोणती खेळी खेळून उमेदवारी देणार? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. राजेभाऊ फड हे शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश करणार आहेत. त्यावेळी परळी मतदारसंघातून हजार कार्यकर्ते सोबत असतील असे त्यांनी स्पष्ट केले. आता सध्या पक्ष प्रवेश होत आहे. जर शरद पवार यांनी उमेदवारी दिली तर परळी मतदारसंघात ताकदीने लढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शरद पवार परळी मतदारसंघासाठी स्वतः मैदानात उतरल्याने येथे विधानसभेसाठी चुरस दिसून येणार आहे.






# सावित्री - फातिमा सद्भावना मंच बीड तर्फे फिरत्या ग्रंथालयाचे स्वागत

प्रतिनिधी । बीड

इस्लामिक मराठी पब्लिकेशन ट्रस्ट मुंबई द्वारे संचालित इस्लामिक मराठी फिरते ग्रंथालय दरवर्षी महाराष्ट्रात जात असते. काल हे ग्रंथालय बीड मध्ये आले असता सावित्री - फातिमा सद्भावना मंच बीड तर्फे या ग्रंथालयाचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी मंच चे अध्यक्ष लोकपत्रकार भागवत तावरे, उपाध्यक्ष सूफियान मणियार, कोषाध्यक्ष एस एम युसुफ तसेच ज्येष्ठ मार्गदर्शक व दै. तामिर से संपादक काझी मगदुम, जमात ए इस्लामी हिंद बीड चे सचिव शेख मोइजुद्दीन यांनी पुष्पगुच्छ देऊन ग्रंथालयाचे संचालक शेख मुसा यांचे स्वागत केले. या ग्रंथालयात इस्लाम धर्मावर आधारित अनेक पुस्तकाचे प्रदर्शन करण्यात आले होते. दिव्य कुराण मराठी भाषांतर, पैगंबर चरित्र, स्त्री व बालकांविषयी विविध विषय या ग्रंथालयाद्वारे सादर करण्यात आले होते.शहरातील रसिक वाचकांनी या ग्रंथालयाला भेट देऊन पुस्तकांचा लाभ घेतला.बशीरगंज परिसरात हनुमान मंदिर समोर ग्रंथालयाच्या आयोजनात मंदिराचे विश्वस्त मदन महाराज शिवनिकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मराठा आंदोलक आक्रमक, धुळे-सोलापूर महामार्ग दोन्ही बाजूने अडवला

प्रतिनिधी । बीड

विधानसभा निवडणुकीच्याआधी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आता पुन्हा एकदा वातावरण तापताना दिसत आहे. मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज आठवा दिवस आहे. मनोज जरांगे यांची आता प्रकृती ढासळताना दिसत आहे. त्यांची ही परिस्थिती पाहून मराठा आंदोलक आक्रमक होताना दिसत आहेत. मराठा आंदोलकांनी आज अंतरवली सराटी



गावापासून दीड किलोमीटर अंतरावर वडीगोद्री गावाजवळ धुळे-सोलापूर महामार्ग अडवला आहे. विशेष म्हणजे आंदोलकांमध्ये महिला आणि मुलीदेखील आहेत. जवळपास तासाभरापासून आंदोलकांनी दोन्ही बाजूने मार्ग रोखून धरला आहे. वडीगोद्री येथे मराठा आणि ओबीसी समाजाचे आंदोलक आमनेसामने आल्याच्या बातम्या सातत्याने समोर येत होत्या. यानंतर आता मराठा समाजाचे आंदोलक थेट रस्त्यावर आल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. पोलीस आता परिस्थिती कशी हाताळतात? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# आवरगाव ग्रामपंचायतीला राज्य शासनाचा स्व.आबासाहेब खेडकर विशेष राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

किल्लेधारुर / रोहित फावडे

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियाना अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा २०१९-२० यावर्षीचा विशेष पुरस्कार हा स्मार्ट ग्राम आवरगाव तालुका धारूर जिल्हा बीड या ग्रामपंचायतीला जाहीर झाला होता तो पुरस्कार २३ सप्टेंबर रोजी या ग्रामपंचायतीला प्रदान करण्यात आला, याचे स्वरूप दोन लक्ष रुपयांचा धनादेश,प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह असे होते

महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धे अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन परवा २३ सप्टेंबर



रोजी छत्रपती संभाजी नगर येथे केले होते .या समारंभाचे अध्यक्ष पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील होते, तर प्रमुख उपस्थिती अल्पसंख्यांक व पणन मंत्री तथा संभाजीनगर चे पालकमंत्री अब्दुल सत्तार , माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड , राज्याचे मंत्री अतुल सावे यांच्या सह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संत एकनाथ रंगमंदिर, नवीन उस्मानपुरा,छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झाला,या सोहळ्यात २०१९-२० या वर्षातील विशेष राज्यस्तरीय पुरस्कार आवरगाव, या ग्रामपंचायती ला देण्यात आला या ग्रामपंचायतीने विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून त्या माध्यमातून स्व.आबासाहेब खेडकर पुरस्कार प्राप्त केला आहे. या ग्रामपंचायतीने बंदिस्त गटार प्रणालीद्वारे प्रभावी सांडपाणी व्यवस्थापन, पाऊस पाणी संकलन, जांभूळ प्रकल्प, ५००० पेक्षा जास्त वृक्ष लागवड, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा कक्ष स्थापन केले आहे तसेच महिलांसाठी सभागृह सुद्धा उभारले आहे.

२०१९-२० या वर्षातील विशेष राज्यस्तरीय पुरस्काराचे मान्यवरांच्या हस्ते स्वीकार करताना आवरगावचे सरपंच अमोल जगताप, सीईओ संगीता देवी पाटील,पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, ज्येष्ठ नागरिक, युवक मंडळ आणि महिलांच्या सदस्य उपस्थित होते.या पुरस्कारामुळे आवरगाव ग्रामपंचायत, सरपंच अमोल जगताप ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब झोंबडे,यांच्या सह गावकऱ्यांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सह्याद्री हॉस्पिटल ते जुना मोंढा रोडचे काम त्वरित सुरू करा-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

अनेक वर्षापासून बीड शहरातील सह्याद्री हॉस्पिटल ते जुना मोंढा रोडच्या कामाची मागणी असून हे काम विशिष्ट योजनेतून मंजूर झालेले काम तातडीने सुरू करावे अशा प्रकारचे निवेदन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना दिले असून हे काम झाल्यास ऐन सणासुदीत नागरिकांची गैरसोय होणार नाही

बीड शहरातील विविध रस्त्यांची कामे झाली असून सह्याद्री हॉस्पिटल ते जुना मोंढा हे काम खूप दिवसापासून रखडलेले आहे हे काम व्हावे यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू होता अनेक वर्षापासूनची या भागातील नागरिक व्यापारी यांची मागणी होती, मुख्य रस्ता आणि वर्दळीचे दळणवळण याच रस्त्यावरून असल्यामुळे हे काम व्हावे यासाठी प्रयत्न सुरू होते, विशिष्ट योजनेतून मंजूर झालेले हे काम तातडीने व्हावे अशा प्रकारची मागणी या



भागातील नागरिकांनी आणि विविध व्यापारी संघटनांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे केली होती त्यानुसार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन सह्याद्री हॉस्पिटल ते जुना मोंढा हे काम तातडीने सुरू करावे अशा प्रकारचे निवेदन दिले असून येणाऱ्या नवरात्र,दसरा आणि दिवाळी सणापूर्वी हे काम व्हावे असा आग्रह आहे हे काम झाल्यास व्यापारी,नागरिक आणि खंडेश्वरी दर्शनासाठी,ग्रामीण भागात जाणाऱ्यासाठी सोय होणार आहे

# साऊंड व्यापारी असोसिएशन बीड जिल्हाच्या वतीने कर्कश आवाजाचे प्रेशरमीड बंदी -धम्मानंद वाघमारे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हात साऊंड लाईट व्यापारी असोसिएशनच्या वतीने आज दी २४/०९/२४ रोजी शासकीय विश्रामगृह या ठिकाणी बीड जिल्ह्यातील सर्व साऊंड मालकांनाची बैठक बोलावण्यात आली होती बैठकीदरम्यान सर्व साऊंड मालकांच्या वतीने कर्कश आवाज करणारे प्रेशरमीड व लेजर लाईट या सारख्या शरीरास धोकादायक असणार्या साहीत्यावर साऊंड लाईट व्यापारी असोसिएशन च्या वतीने बंदी घालण्यात आली आहे तसेच साऊंडचा अतीऊद्रेक झाल्यामुळे प्रशासनाला सहकार्य करण्यसाठी बीड असोसिएशनच्या वतीने सर्व साऊंड मालक यांना दोन बेस,दोन टॉप लावण्याचे आदेश दीले आहेत. जो साऊंड मालक असोसिएशनचे नीयम मोडुन साऊंड लावत असेल तर साऊंड



मालका वीरोधात साऊंड असोसिएशन स्वत:पुढाकार घेऊन गुन्हा दाखल करणार आहे. तसेच प्रशासकीय अधिकारी कर्मचारी यांना देखील सहकार्य करणार आहे तसेच बाहेर जिल्ह्यातुन येणार्या साऊंड मालकांना देखील बीड जिल्हा असोशीयन ठरवलेल्या नीयमातच साऊंड घेऊन या अन्यथा त्यांच्या वीरोधात देखील असोसिएशन पोलीस कार्यवाही करणार आहे बाहेरील साऊंड मुळे बीड जिल्ह्यातील साऊंड मालक व पोलीस प्रशासन यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे अशी माहिती बीड जिल्हा असोसिएशन चे अध्यक्ष धम्मानंद वाघमारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# आंदोलनाची दिशा समाजाच्या लक्षात यावी यासाठी आदर्श देवगाव मधून साखळी उपोषण सुरू

## मराठा समाजाचा सुद्धा धनगर समाजाच्या एसटी आरक्षण संदर्भात जाहीर पाठिंबा एसटी आरक्षणाची अंमलबजावणी हाच खरा धनगर समाज बांधवांचा लढा

वडवणी बीड ।प्रतिनिधी

धनगर बांधवांनी संभ्रमात न राहता एस टी आरक्षणाच्या पाठीमागे ठाम राहावे ,यातूनच समाजाला न्याय मिळेल ओबीसी बचाव मध्ये धनगर बांधवांचा वापर होतोय ,यातून समाजाला न्याय मिळणार नाही धनगर जमातीचा पूर्वी पासून लढा हा एस टी आरक्षणाची अंमलबजावणी हाच असून समाजामध्ये संभ्रम अवस्था निर्माण करण्याचे काम समाजातील काही लोक करत आहेत, त्यामुळे धनगर बांधवांचे खरे आंदोलन हे पंढरपूर येथील आहे, त्याच आंदोलनाला वाडी, वस्ती, शेतावर, माळरानावर ,राहणाऱ्या मेंढपाळ बांधवांचा पाठिंबा आहे,त्यामुळे संबंध धनगर बांधवांनी ओबीसी बचाव हे आंदोलन धनगर बांधवांचे नसून पंढरपूर येथील आंदोलन एस टी आरक्षण अंमलबजावणी यावर फोकस करणे गरजेचे आहे त्यामुळे च आंदोलनाची खरी दिशा बांधवांना लक्षात यावी यासाठी वडवणी तालुक्यातून साखळी उपोषणाची सुरुवात करण्यात येत आहे यावेळी उपोषणास बसलेले देवगाव येथील समाज बांधव,, आता राज्यातील ग्रामीण भागामध्ये धनगर समाजाच्या एसटी आरक्षण साठी आता गावागावात साखळी उपोषण सुरू आहेत तरी बीड जिल्ह्यातील सर्व गावातील धनगर समाज बांधवांनी पंढरपूर येथील एसटी आरक्षण अंमलबजावणी साठीच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी प्रत्येक गावातून साखळी उपोषणाची सुरुवात करावी उपोषण करत असताना सर्व समाज बांधवांना




गावातील सर्व जाती-धर्मातील लोकांना सोबत घ्यावे जातीय तीळ निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी गावातील वातावरणात सलोखा राहील याची काळजी घ्यावी आंदोलनाला कसल्याही प्रकारचे हिंसक वळण लागु देऊ नये कारण प्रत्येक वेळी आनंदाचे व संकटाच्या वेळी गाव गडातील माणूसच आपल्या मदतीला येत असतो आपल्या सुखदुःखात सहभागी होत असतो त्यामुळे सर्वांच्या भावनांचा अनादर होईल असे वातावरण होऊ देऊ नये असे आवाहन सकल धनगर बांधवांच्या वतीने करण्यात येत आहे तरी महाराष्ट्रातील सत्ताधारी व विरोधी विधानपरिषदेचे सर्व सदस्य व मंत्रिमंडळ यांनी धनगर बांधवांच्या भावनांची कदर करून ७५ वर्षापासून लढत असलेल्या लढ्याचा विचार करता सहानुभूतीपूर्वक एसटी आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करावी सत्यादाराबद्दल धनगर बांधवांच्या मनात निजामी राजवटीपेक्षा जुलमी राजवट राज्यकर्त्यांची दिसून येत असून आता वेळ न दवडता पंढरपूर येथील आंदोलकांचा विचार करता व संबंध महाराष्ट्रातील धनगर समाज बांधवांना आरक्षणाची अंमलबजावणी करावी अशी मागणी होत आहे.

# धानाच्या हमी भावाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी जयश्रीताई जरातेना आमदार करा

## भेंडाळा येथील कार्यकर्ता मेळाव्यात भाई मोहन गुंड यांचे आवाहन शेकापच्या वतीने गरीबाना ७० घरकुलाचे वाटप.

चामोर्शी ।प्रतिनिधी

गडचिरोली जिल्ह्यातील मुख्य पीक असलेल्या धानाला हामी भाव मिळवून देण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष सक्षम आहे. शेकापने शेतकऱ्यांचे आनेक लढे लढले आणि यापुढे ही रामदास जराते सारखे शिलेदार लढत आहेत. सामान्य माणसांच्या प्रश्नांसाठी स्वतःवर केसेस घेवून सातत्याने रस्त्यावरचा संघर्ष करणाऱ्या जयश्रीताई जराते यांना शेतकऱ्यांनी एकत्र येवून आमदार करावे, असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांनी केले.

गडचिरोली विधानसभा क्षेत्राच्या उमेदवार जयश्रीताई जराते यांच्या प्रचार - प्रसाराचे धोरण ठरविण्यासाठी चामोर्शी तालुक्यातील विक्रमपूर - फराडा व भेंडाळा - मुरखळा जिल्हा परिषद क्षेत्रातील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांचा भेंडाळा येथे रविवार दिनांक २२ सप्टेंबरला कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. पुढे ते म्हणाले की, २०१९ साली धानाला केवळ १८०० रुपये हमीभाव होता. भाई रामदास जरातेंच्या नेतृत्वात गडचिरोली विधानसभा क्षेत्रात एकाचवेळी १४ ठिकाणी शेतकरी कामगार पक्षाने चक्काजाम आंदोलन करुन सरकारला २२०० रुपये हमीभाव देण्यासाठी भाग पाडले. येणाऱ्या निवडणूकीत जयश्रीताईंना येथील शेतकऱ्यांनी आमदार म्हणून विधानसभेत पाठविले तर धानाला ४००० हजार रुपये हमीभाव मिळवून दिल्याशिवाय शेतकरी कामगार पक्ष स्वस्थ बसणार नाही,असे आश्वासन ही भाई मोहन गुंड यांनी यावेळी दिले.

शेकापचे रस्ते महामार्ग बाधित शेतकरी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष भाई दिगंबर कांबळे यांच्या हस्ते या कार्यकर्ता मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. सह उद्घाटक म्हणून




जयश्रीताई जराते, अध्यक्ष म्हणून शेकाप आदिवासी, भटके - विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष भाई रामदास जराते उपस्थित होते. यावेळी ड निखिल बचुटे, भाई शामसुंदर उराडे (मध्यवर्ती समिती सदस्य) डॉ. गुरुदास सेमस्कर (जिल्हा समिती सदस्य), भाई अक्षय कोसनकर (युवा नेते), कविता ठाकरे (जिल्हाध्यक्ष महिला आघाडी), गुड्डू हुलके (जिल्हाध्यक्ष युवक आघाडी), अभिलाषा मंडोगडे (जिल्हाध्यक्ष विद्यार्थी आघाडी), भाई पवित्र दास (जिल्हाध्यक्ष कामगार आघाडी), भाई प्रभाकर गव्हारे (जिल्हाध्यक्ष महामार्ग बाधित शेतकरी आघाडी), भाई शर्मीश वासनिक (जिल्हाध्यक्ष शिक्षक आघाडी) तर विशेष अतिथी म्हणून दामोधर रोहनकर, गंगाधर बोमनवार, प्रदिप आभारे, पांडूरंग गव्हारे,चंद्रकांत भोयर सौ. पोर्णिमाताई कांबळे, सौ. साधनाताई बानबले, सौ. पपीताताई सातपुते, डॉ. भाऊराव चौधरी, देवेंद्र भोयर प्रामुख्याने उपस्थित होते.

भाई रामदास जराते व जयश्रीताई जराते यांच्या प्रयत्नाने मौजा मोहुर्ली व सगणापूर येथील ८ ढिवर कुटूंबाना घरकुल मंजूर झाले. यावेळी त्या लाभार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते घरकुलांचे स्मृती चिन्ह देवून सन्मानीत करण्यात आले.

# केंद्र सरकारने कांदा आयातीवर शंभर टक्के बंदी घालावी :- वैभव शिंदे

नेकनूर ।प्रतिनिधी

कांदा आयात-निर्यातीचे केंद्राच धोरण शेतकर्यांचे मरण या शब्दालाच अनुसरून सुरू आहे.केंद्र सरकारकडून कांद्याचे बाजारभाव नियंत्रणात ठेवण्यासाठी परदेशातून कांदा आयात करण्यासाठी परवानगी दिल्याने अफगणिस्तानमधून पंजाब राज्यातील अमृतसर,जालंदर या शहरांमध्ये ११ मालट्रकमधून दाखल झाला आहे ,तर कांद्याने भरलेल्या पंचेचाळीस ते पन्नास ट्रक बॉर्डरवर उभ्या असल्याने येत्या दोन-तीन दिवसांमध्ये भारतात मोठ्या प्रमाणात अफगाणिस्तानचा कांदा दाखल होणार असल्यामुळे आता



महाराष्ट्रसह देशभरातील कांदा बाजारभाव पडण्याची शक्यता आहे. कांद्याचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्राच्या वाणिज्य मंत्रालयाच्या ग्राहक संरक्षण विभागाकडून किंमत स्थिरीकरण निधी अंतर्गत पाच लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्यात आला होता. दिल्ली,मुंबई,चेन्नई,कलकत्ता,भुवनेश्वर या संदेशातील मेगा मेट्रो सिटी मध्ये तीस ते पस्तीस रुपये किलो प्रमाणे केंद्रे सुरू करत विक्री सुरू केली,मात्र कांद्याचे दर नियंत्रणात येत नसल्यामुळे आता केंद्र सरकारने परदेशातून कांदा आयातीला परवानगी दिली आहे.हा आयात केलेला कांदा महाराष्ट्रापर्यंत पोहोचल्यावर कांद्याचे दर १० ते २० रुपयांनी कमी होण्याची शक्यता आहे. देशांतर्गत बाजारपेठेत मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्यामुळे कांद्याचे दर किरकोळ बाजारात ६० ते ७० रुपये किलो आणि घाऊक बाजारात क्विंटलमागे ४५०० ते ४७०० रुपयांवर पोहोचले आहेत. वाढणारे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने अफगाणिस्तानातून कांदा आयात सुरू केली आहे.अनेक महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर शेतकऱ्यांच्या कांद्याला कुठेतरी आता चांगला दर मिळत असताना अद्यापही केंद्र सरकार कांदा निर्यातीवर २० टक्के शुल्क घेत असतानाही अफगाणिस्तानमधून कांदा आयात करण्यास परवानगी दिली.त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे.शेतकर्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याची आयात तात्काळ थांबवावी,अशी मागणी वैभव शिंदे यांनी केली आहे.

# कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाला प्रदर्शनापूर्वीच आंतरराष्ट्रीय पुरस्कार

## दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

बीड ।प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्याचे सुपुत्र तथा बीड जिल्ह्याचे जावई लेखक, दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाला आंतरराष्ट्रीय दर्जाचा पुरस्कार मिळाला आहे. या चित्रपटामुळे दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाची इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल मध्ये निवड झाली आहे. परदेशात कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाचे स्क्रीनिंग झाले. यावेळी चित्रपटाचे अनेकांनी कौतुक करत लेखक दिग्दर्शक अल्ताफ शेख यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वाणिज्य दुत, पनामा, हेड ऑफ रीजन




मेरीटाईम ऑथरिटी जिजस कँपोस, डॉ. अमजदखान, नाशिकच्या विभागीय आयुक्त संगीता धायगुडे यांच्या हस्ते अल्ताफ शेख यांना सन्मानित करण्यात आले. कर्मयोगी आबासाहेब हा चित्रपट सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदारसंघाचे तब्बल अकरावेळा आमदार आणि दोन वेळा कॅबिनेट मंत्री राहिलेले दिवंगत आबासाहेब ऊर्फ गणपतराव देशमुख यांच्या जीवन चरित्रावर बनविण्यात आला आहे. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांनी केले आहे. मायाक्का माऊली फिल्म प्रोडक्शन आणि मुंबई किएशन एंटरटेनमेंट निर्मित कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाचे बाळासाहेब एरंडे व मारुती बनकर हे या चित्रपटाचे निर्माते आहेत सांगोल्यातल्या तमाम जनतेने चित्रपट चित्रे करण्याच्या वेळी सहकार्य केलं विशेष सहकारी उल्हास धायगुडे पाटील यांचे लाभलं चित्रपटा. येत्या दिनांक २५ ऑक्टोबर २०२४ ला संपूर्ण जगभर हिंदी आणि मराठी भाषेत कर्मयोगी आबासाहेब हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. स्वतःला जनसेवेत वाहून घेतलेल्या दिवंगत गणपतराव देशमुख उर्फ आबासाहेब या आदरणीय व्यक्तिमत्त्वावर हा चित्रपट असल्याने रसिक श्रोते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT